पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

दिनांक – **०६/११/२०२०** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती**ची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०६/११/२०२०** रोजी दुपारी ३**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा)सोनवणे
६. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) श्री.राजेंद्र राणे पदनाम-कार्यकारी अभियंता यांचे बढतीबाबत – मा.सुजाता पालांडे , मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) शासनाने मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियम व मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता (पर्यावरण) हे अभिमानाचे रिक्त पद पदोन्नतीद्वारे भरणेबाबत.- मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.- मा.पौर्णिमा सोनवणे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) म.न.पाचे धर्मवीर संभाजी महाराज उद्यानाचे लॉनचे नुतनीकरण करणेचे कामकाज बापुजी बुवा उद्यान थेरगांव येथे करणेबाबत.- मा.पौर्णिमा सोनवणे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.६ मधील चौकांचे सुशोभिकरण करणे.- मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.३२ मधील वसंतदादा पाटील पुतळा व परिसर सुशोभिकरणे करणे या कामाच्या जागेत बदल करणेबाबत. – मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.२५ वाकड आ.क्र.४/११ जकात नाकाचे जागेसाठी सिमाभिंत घालणे या कामास मुदतवाढ घेवून सदर कामातून वाकड आरक्षण क्र.४/२३ येथील आरक्षणाच्या जागेत वर्ग खोल्या बांधणे व इतर स्थापत्य् विषयक कामे करणेच्या कामास(साईट बदलास) मान्यता मिळणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) ऐनवेळचा विषय दाखल करुन घेवून मान्यता मिळणेबाबत.-मा.सुजाता पालांडे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

---------

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.विधी समितीची शुक्रवार दिनांक ६/११/२०२० रोजी होणारी पाक्षिक सभा(कार्यपत्रिका क्रमांक ०२) दिनांक १०/१२/२०२० रोजी दुपारी १२.००वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सदर सभा ही गुरुवार दि.१०/१२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

( ०६/११/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक – १०/१२/२०२० वेळ – दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०६/११/२०२० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक १०/१२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा. स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे
६. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.आगळे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.विधी समितीची गुरुवार दिनांक १०/१२/२०२० रोजी होणारी पाक्षिक सभा(कार्यपत्रिका क्रमांक ०२) दिनांक १४/१२/२०२० रोजी दुपारी २.००वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सदर सभा ही सोमवार दि.१४/१२/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

( दि.०६/११/२०२० व १०/१२/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक – १४/१२/२०२० वेळ – दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १०/१२/२०२० ची तहकूब सभा सोमवार दिनांक १४/१२/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.लोणकर- उप आयुक्त, मा.लिमण- प्र.कार्यालय अधिक्षक तथा उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

अ) दिनांक १५/०५/२०२०(दु.३.००वा.),०८/०६/२०२०(दु.१.००वा),१२/०६/२०२०(दु.१२.००वा) रोजी

झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १६**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक २३/१०/२०२० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

**विषय- श्री.राजेंद्र राणे पदनाम-कार्यकारी अभियंता यांचे बढतीबाबत...**

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास दिनांक ३० ऑगस्ट २०१९ रोजी नगरविकास विभागाकडील शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदावर नोकरभरती व पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र शासनाने दिनांक १८/०२/२०२० रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मंजूर केलेले आहेत. सदरचे सेवाप्रवेश नियमानुसार महानगरपालिकेतील यापुढील नोकरभरती, पदोन्नत्या व आश्वासित प्रगती योजना लागू होणार असल्याबाबत महानगरपालिकेने दिनांक २८/०५/२०२० रोजी परिपत्रक प्रसिद्ध केलेले आहे. दिनांक ११/०९/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासन विभागामार्फत उपअभियंता (पर्यावरण) व उपअभियंता (वाहतुक नियोजन) अभिनामांच्या या पदांवर पदोन्नती देणेकरीता परिपत्रक प्रसिद्ध करणेत आलेले आहे. सदर परिपत्रकातील अनुक्रमांक 'अ' नुसार उपअभियंता (पर्यावरण) या पदाची शैक्षणिक अर्हता पर्यावरण अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदव्युत्तर पदवी अशी असुन पदोन्नतीचे प्रमाण १००% असे आहे. तरी शासनाने मंजुर केलेल्या सेवाप्रवेश नियम व मंजुर आकृतीबंधानुसार उपअभियंता (पर्यावरण) या अभिनामाची पदे १०० % पदोन्नतीद्वारेच भरणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.पौर्णिमा सोनवणे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

निविदा क्र. ४२/२७/२०१९-२० अन्वये मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन्स यांचे मार्फत साने चौक ते शिवरकर चौक रस्त्याचे डांबरीकरण कामामधील शिल्लक डांबरीकरणाचे काम हे संतकृपा हौ.सोसा., म्हेत्रेवाडी मधील ३०० मीटर व भावेश्वरी हौ.सोसा., मोरेवस्तीमधील २५० मीटर रस्त्याचे डांबरीकरण करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ : मा.पौर्णिमा सोनवणे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका उद्यान विभागामार्फत निविदा नोटीस क्र.१०/२०१८-१९ अन्वये धर्मवीर संभाजी महाराज उद्यानाचे लॉनचे नुतनीकरण करणेकामी मे.जी.बी.एन्टरप्रायजेस यांना निविदा रक्कम रु.२०,७६,६३७/- पेक्षा २०.४०% पेक्षा कमी (र.रु.१६,५३,००३) दराने ६ महिने कालावधीसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.५६६८ दि.१८/०९/२०१९ अन्वये खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य विषयक कामकाज २ वर्षांचा कालावधी लागणार असल्याने सदरचे कामकाज धर्मवीर संभाजी महाराज उद्यानाचे लॉनचे नुतनीकरण करणेचे कामकाज बापुजी बुवा उद्यान, थेरगांव येथे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ०५

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.६ मधील चौकांचे सुशोभिकरण करणेचे काम मे.संकेत रामदास गायकवाड यांना क्र.स्था/नि/क-मुख्य/४२७/२०१९ दि.१९/१२/२०१९ चे आदेशान्वये देणेत आलेले आहे. सदर कामातुन र.रु.४,००,०००/-चे काम नविन भोसरी रुग्णालय येथे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ०६

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३२ मधील वसंतदादा पाटील पुतळा व परिसर सुशोभिकरण करणे या कामाच्या जागेत बदल करणे. निविदा क्र.९/९५-२०१९-२० चे निविदेचे काम करणेत येत आहे. त्यानुसार सदर ठिकाणी पुतळयाचे सुशोभिकरण करणे व परिसर विकसित करणे हे काम पूर्ण झालेले आहे. सदर निविदा रकमेतील अंदाजे र.रु.६०००००/- शिल्लक आहे. उर्वरित रकमेतून मा.नगरसदस्य यांच्या मागणीद्वारे प्रभाग क्र.३२ सांगवी मध्ये इतर स्थापत्य विषयक कामे करणेस तसेच वसंतदादा पाटील पुतळा व परिसर सुशोभिकरण करणे या कामाच्या जागेत बदल करणे या कामाच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ०७

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२५ वाकड आ.क्र.४/११ जकात नाक्याचे जागेसाठी सिमाभिंत घालणे (निविदा क्र.७५/०३/२०१७-१८ व निविदा र.रु.२,०९,१५,९३८/-) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.राहुल कन्स्ट्रक्शन यांना दि.०७/०६/२०१८ रोजी देणेत आलेले आहे. कामाचे आदेश प्राप्त होताच ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली असता आरक्षणाच्या जागेच्या हद्दीबद्दल स्थानिक शेतकरी यांनी आक्षेप घेतलेमुळे काम करता आले नाही. सदर आरक्षणाच्या जागेचे मनपाच्या नगररचना व विकास विभागामार्फत सिमांकन करुन घेणेत आले. तदनंतर तेथील आरक्षणाची हद्द कायम करुन दि.०४/०३/२०१९ रोजी सिमाभिंत बांधणेचे कामास सुरुवात करणेत आली त्यानुसार ताब्यात आलेल्या जागेत ४०% सीमाभिंत बांधणेचे काम करणेत आलेले आहे.परंतु मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.EG/शिहिमेरे/२.१९/प्र.क्र.२/३६७/शाखा-१, दि.२४/०७/२०१९ अन्वये हिंजवडी-शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन प्रकल्प-३ चे काम सुरु असुन हिंजवडी कडून शिवाजीनगर चौक मार्गे सदर मार्गीकरणाचे भुजबळ चौक (वाकड) येथे रा.म.४ लगत पुण्याच्या दिशेने वळण प्रस्तावित आहे व भुजबळ चौकाच्या पुढे उजव्या बाजूस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जागेत मेट्रो स्टेशन घेणेसाठी तांत्रिक तपासणी चालू आहे. सद्यस्थितीत महापालिकेच्या या जागेत संरक्षण भिंतीचे (Compound Wall) काम सुरु केले असल्याचे निदर्शनास येत आहे. मेट्रो प्रकल्पासाठी प्राधान्याने शासनाच्या ताब्यातील जागेत स्टेशन व जीने प्रस्तावित करण्यात येणार असल्याने महानगरपालिका मार्फत याठिकाणी चालु असल्याने काम थांबविणे बाबत कळविले आहे. त्यानुसार सदर ठिकाणी सीमाभिंत बांधण्याचे थांबविण्यात आले आहे. प्रभाग क्र.२५ वाकड गावठाण येथे मनपा ची मुलांची प्राथमिक शाळा आहे. सदरची शाळा इमारत ही ४५.०० मी.रस्ता रुंदीकरणाणे बाधीत होत आहे. यापुर्वी ४५.०० मी.डीपी रस्ता रुंदीकरणात शाळेच्या वर्ग खोल्या BRTS विभागामार्फत पाडण्यात आलेले आहे, त्यामुळे तेथील मुलांची गैरसोय होत आहे. तथापी सदर शाळेला लागुन असलेल्या मौजे वाकड सर्व्हे न.१६९ पैकी येथील आरक्षण क्र.४/२३ प्राथमिक शाळेचे आरक्षण असुन त्या आरक्षणाच्या जागेत प्रभाग क्र.२५ वाकड आ.क्र.४/११ जकात नाक्याचे जागेसाठी सीमाभिंत घालणे या कामातुन शाळेतील मुलांकरिता वर्ग खोल्या बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे बाबत मा.नगरसदस्यांची मागणी आहे. सदर कामाचे आवश्यकता लक्षात घेता प्रभाग क्र.२५ वाकड आ.क्र.४/११ जकात नाक्याचे जागेसाठी सीमाभिंत घालणे (नि.नो.क्र.७५/०३/२०१७-१८) या कामाची मुदत संपुष्टात येत असुन त्यास मुदतवाढ घेवुन या कामाच्या निविदेतुन सदरच्या वर्ग खोल्या बांधण्यात येऊ शकतील. सद्य स्थितीत निविन निविदा काढुन काम करणे शक्य नाही. सदर कामाच्या निविदा दर २२.६६% कमी असल्याने सदर कामाच्या निविदेतुन वर्ग खोल्या बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे केल्यास मनपाचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नसुन फायदाच होणार आहे. तथापी प्रभाग क्र.२५ वाकड आ.क्र.४/११ जकात नाक्याचे जागेसाठी सीमाभिंत घालण्याचे

कामास दि.३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देवुन सदर कामातुन मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार त्या कामामधुन शाळेच्या मुलांकरिता आरक्षण क्र.४/२३ येथे वर्ग खोल्या बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करण्याच्या कामास (साईट बदलास) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - ०८

दिनांक - १४/१२/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सह आयुक्त (Joint Commissioner) अभिनामाचे एक पद मंजूर असून रिक्त आहे. शासनाने महापालिकेतील विविध पदांच्या भरती प्रक्रीये करीता सेवा(सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मंजूर केले आहेत. त्यानुसार सह आयुक्त पदाची पदोन्नतीकामीची अर्हता पुढील प्रमाणे आहे.

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | नेमणूकीकरीता अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | सह आयुक्त | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर, सह आयुक्त पदाच्या कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

सह आयुक्त पदाकरिता शासनाने पदोन्नतीकामी निश्चित केलेल्या अर्हतेमध्ये स्पष्टता दिसून येत नाही. त्यामध्ये स्पष्टता आणणे आवश्यक आहे. सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी कनिष्ठ पदामध्ये (Feeder Cadre) उप आयुक्त आणि नगरसचिव या MMC Act Sec 45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील समकक्ष पदांचा समावेश आहे. सबब, सह आयुक्त पदावर पदोन्नतीने नेमणूकीकामी सेवा नियम अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## पदोन्नतीकामी सुधारित अर्हता

| संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दती | नेमणुकीकरीता सुधारित अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा श्रेणी- १ | सह आयुक्त (Joint Commissioner) | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त कोणत्याही विद्यापीठाचा पदवीधर<br>१) MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या गट-अ मधील सह आयुक्त पदाचे कनिष्ठ समकक्ष पदावरील किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक |

'अतिरिक्त आयुक्त' या पदाकरिता शासनाने MMC Act Sec.45 अंतर्गत प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या पदांवर काम करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-यांची नेमणूक करणेबाबतची अर्हता शासन निर्णयाद्वारे निश्चित केली आहे. सबब सह आयुक्त हे अतिरिक्त आयुक्त पदाचे कनिष्ठ पद असल्याने या पदाकरिताही उपरोक्त नमूद प्रमाणे अर्हता निश्चित करणे उचित होणार असल्याने MMC Act Sec.45 अंतर्गत महापालिका अस्थापनेवर प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त अथवा नगरसचिव या कनिष्ठ पदांवर (Feeder Cadre) काम करणा-या सेवा ज्येष्ठ अधिका-यांची पदोन्नतीने नेमणूक करणेकामी अर्हता निश्चित / स्वयंस्पष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उप आयुक्त अथवा नगरसचिव या समकक्ष पदांवरील निवड समितीने विहीत पध्दतीने निवड केलेल्या सेवाज्येष्ठ अधिका-याची नेमणूक मा.विधी समिती आणि मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवून रितसरपणे मा.महापालिका सभेच्या मान्यतेने करण्यास आणि सेवाज्येष्ठ अधिका-यास पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३७७/२०२०
दिनांक : १८/१२/२०२०

**(गोरखनाथ लिमण)**
प्र.कार्यालय अधिक्षक तथा
उप-नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## परिशिष्ट - (२)

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०२०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम - ४५ व कलम - ५३ (१) मधील तरतुदींनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठीची कलम - ४५(३) व कलम - ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता

(पहा नियम-३)

| अ. क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | **(१) प्रशासकीय विभाग** |
| १ | प्रशासकीय सेवा श्रेणी - १ | आयुक्त (महानगरपालिका आयुक्त) | प्रतिनियुक्ती | १) राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३६ नुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी) |
| २ | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | अतिरिक्त आयुक्त | पदोन्नती - १ पद | १) शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दि. ०६/०१/२०१५, दि.७/१/२०१५ व दि.२५/६/२०१५ नगर विकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अर्हतेनुसार (शासन वेळोवेळी सदर अर्हतेत बदल करेल असे बदल लागू राहतील.) |
| | | | प्रतिनियुक्ती- २ पदे | १) राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणुक करण्यात येईल असा शासनाचे सह सचिव, उप सचिव दर्जाचे/ मुख्य अधिकारी (निवडश्रेणी) किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नियुक्त करता येईल. |
| | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | सह आयुक्त | पदोन्नती -१०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर, सह आयुक्त पदाच्या कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |